ISSN 2231-1629 Knowledge Resonance
A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal
IMPACT FACTOR 8.072

# मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण उपलब्धी आणि आव्हाने

**प्रा. किशोर एम. नैताम**
*श्री. बिंझाणी सिटी कॉलेज, नागपूर*

***सारांश :***
*स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात परराष्ट्र धोरणाच्या मुलभूत तत्वात परीवर्तन झाले नसले तरी जागतिक परिस्थितीनुसार या तत्वाचे स्वरूप बदलत गेले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बदलते स्वरूप शेजारी राष्ट्रांशी असलेले संबंध आणि आर्थिक संपन्न त्या सोबतच अंतर्गत धोरणासंबंधी प्रश्न इत्यादींचा भारतीय परराष्ट्र धोरणावर परिणाम घडून आला आहे.*
*स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळात महाशक्तीचा तणावाला प्रारंभ झाला असतांना अशा तणावग्रस्थ परिस्थितीत कोणत्याही गटात सामील न होता सर्वांशी मित्रत्वाचे संबंध ठेवून आपली प्रगती घडवून ठेवण्यासाठी भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अलिप्ततेचे धोरण प्रतीवादीत केले. परंतु काळाच्या ओघात अलिप्ततावादाची जागा वास्तववादाने घेतली. 1947 ते 2014 या 65 वर्षाच्या कालखंडात भारत देशाला अनेक पंतप्रधानाचे नेतृत्व लाभले. परंतु भारताच्या स्वातंत्र्यापासून भारताचे परराष्ट्र मंत्र्यांनी परराष्ट्र धोरणाला नवीन दिशा देण्याचा वेळोवेळी प्रयत्न केलेला आहे. 2014 ते 2020 या भारताच्या सत्तर वर्षाच्या काळामध्ये परराष्ट्र व संरक्षण धोरण सर्वाधिक चर्चेचा विषय बनला आहे. 2014 मध्ये भारताचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी सूत्रे हातात घेतली.*
*जगातील सर्व देशांना मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचे आव्हान आहे. दरम्यानच्या कालावधीत 75 हून अनेक प्रदेशच चिन बरोबरच्या डोकलामचा वाद, पाकिस्तान विरोधी सर्जीकल ऑपरेशन, मुस्लीम राष्ट्रांबरोबर संबंध सुधारण्यासाठी ते अंतराळातील उपग्रह वाढण्याची क्षमता विकसीत करण्याचे प्रयत्नात मोठया घडामोडी घडल्या. त्याचप्रमाणे शंघाय सहकार्य यासगळया डब्ल्ब्ल्ब वॉसनेर व ऑस्ट्रेलिया या सारख्या प्रभावशाली अंतरराष्ट्रीय संघटनाचे सदस्यत्व मिळविण्याबरोबर अमेरिकेकडून प्राप्त झालेल्या STA-I दर्जा व रशियाकडून प्राप्त झालेली -400 ही क्षेपनास्त्र विरोधी यंत्रणा भारताचे यश मानले पाहिजे. मेक इन इंडिया इत्यादी, मुल्याचे आर्थिक विकासात महत्व सिद्ध करण्याचे धाडस त्यासोबतच ळ. 20 सारख्या संघटनाच्या व्यासपिठावरून भारताची उपलब्धी केलेला व मान्य झालेला काळा पैशाचा प्रश्न यासारख्या उपलब्धी एकीकडे असतांना दुसरीकडे चीन–पाकिस्तान या सारखे देशाची आव्हाने भारतापूढे उभी ठाकली आहेत.*

***बीजशब्द –***
*परराष्ट्र धोरण, राजनय, वास्तवाद, शितयुद्ध, राष्ट्रीय सुरक्षा इ.*

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यापूर्वी साधारण दोनशे वर्ष भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीत होता. आधुनिक अर्थाने स्वातंत्र्य व सार्वभौम राष्ट्र म्हणून भारताचे अस्तीत्व खऱ्या अर्थाने 1947 पासून सुरू झाले. 1947 पासून ते आजतागायत भारत देशात विविध पक्षाचे आणि ध्येय धोरण, वादी विचाराचे, सरकार अस्तित्वात आली. देशाची अखंडता एकात्मता सुरक्षीतता सुनिश्चितता करणे हे सरकारचे कर्तव्य असते. या मार्गावर वाटचाल करतांना देशांच्या अंतर आणि बाह्य स्थितींचा आठावा घेऊन जगातील इतर देशांशी संबंध प्रस्थापित करणे हे सरकारचे उद्दिष्ट्ये असते.

व्यक्ती असो वा राष्ट्र केवळ जन्माने किंवा परंपरेने महान असून चालत नाही. तेवढा मोठेपणा सिद्ध करण्यासाठी कार्यभागही साध्य करावा लागतो. तसच शेजारी देशात आपले वर्चस्व सिद्ध करू शकते अन्यथा स्वतंत्र आणि सार्वभौमत्व हा केवळ परिकल्पना राहतात. या गोष्टीचा भारताला सुरूवातीपासूनच विसर पडलेला आहे.

मोदी सरकारचा आर्थिक निर्णयानंतर सर्वाधिक चर्चेत राहीलेले क्षेत्र म्हणजे परराष्ट्र धोरण आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात आज परराष्ट्र धोरणाची जूेवढी चर्चा 50 वर्षात कधी झाली नाही. तेवढी मोदी सरकारच्या काळात होतांना दिसत आहे. आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये सध्या 193 सार्वभौम केंद्र मान्यता प्राप्त आहेत. यातील प्रत्येक राष्ट्र आपले राष्ट्रीय संबंध साधण्यासाठी प्रयत्न करीत असतात. त्यासाठी परराष्ट्र धोरण आणि राजनयाचा वापर केला जातो. मोदी सरकारच्या पहिल्या कालखंडात त्यांनी 50 हुन अधिक देशांना भेटी देत आर्थिक विकास कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने करण्याचे धोरण अवलंबिले. परराष्ट्र धोरणाकडे भारताचे आर्थिक हितसंबंध साधण्याचे साधन म्हणून पाहिले जावू लागले. आज भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये बदलतांना दिसत आहेत. भारताच्या अंतर्गत विकासासाठी आणि प्रामुख्याने आर्थिक विकासासाठी परराष्ट्र धारेणाचा वापर कसा करता येईल. या दृष्टीने परराष्ट्र धोरणाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. मोदींनी भारताच्या आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण व महत्वाकांक्षी प्रकल्प आखले त्यामध्ये प्रामुख्याने मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्किल इंडीया, स्टार्ट अप इंडिया, स्वच्छ भारत अभियान, इत्यादी प्रकल्पांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी आपले आर्थिक धोरण आणि परराष्ट्र धोरण आखले आहेत.

'मेक इन इंडिया' च्या माध्यमातून देशातील उत्पादन क्षेत्राचा आणि उद्योगधंद्याचा विकास करणे, त्यातून आर्थिक विकास दर वाढविणे आणि मुख्य म्हणजे रोजगाराला चालना देणे अशा प्रकारचे उद्दिष्टे तयार करून त्यानुसार त्यांनी आखणी केली. त्यानुसार या सरकारचे पूर्ण परराष्ट्र धोरण हे उपरोक्त प्रकल्पाभोवतीच

फिरतांना दिसत आहेत. या परराष्ट्र धोरणाचा गाभा हा भारताचा आर्थिक विकास आहे. या परराष्ट्र धोरणामध्ये अनेक नवीन प्रवाह सुद्धा दिसून येतात.

केंद्रात 2014 साली नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार अस्तित्वात आले. मोदी यांनी त्यांच्या पदाचा शपथविधीसाठी शेजारी देशांच्या प्रमुखांना व नेत्यांना आमंत्रीत केले.

**मोदीच्या परराष्ट्र धोरणातील प्रवाह**

**1) सांस्कृतिक प्रवाह**

भारताने आजवर सांस्कृतिक दृष्टिकोणातून परराष्ट्र धोरणाचा फारसा विचार केलेला नव्हता. मोदी सत्तेत आल्यानंतर त्यांनी जगातील इतर देशांशी सांस्कृतिक दृष्टीने मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मोदी सरकारने इतर देशाबरोबर सांस्कृतिक राजनयाच्या माध्यमातून संबंध विकसित करून भारताचे आर्थिक हित संबंध साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. बुद्ध धर्माचा उदय आणि विकास भारतामध्ये झाला परंतु आज बुद्धीष्ठ देशाचे नेतृत्व प्रामुख्याने चिनकडे आहे. 'वल्ड बुद्धीक फेलोशिपला आर्थिक सहाय्य चिन कडूनच दिले जात आहे. परंतु पहिल्यादाच या चिनच्या वर्चस्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न भारताकडून केला जात असल्याचे नियोजनपूर्वक बुद्धिष्ठ देशांना भेटीसाठी निवडणे, बुद्धिष्ठ धर्मस्थळांना भेटी देणे, त्यांच्या धर्म गुरू सोबत चर्चा करणे. त्या धर्मगुरूंना भारतात आमंत्रीत करणे. आणि त्यांच्या विशेष बैठकीचे आयोजन करणे. या सर्वामधून बुद्धीष्ठ बैठकीचे आयोजन करणे. या सर्वामधुन बुद्धीष्ठ राष्ट्रामध्ये भारताबाबत एक सकारात्मक संदेश जात आहे. त्यासोबतच पश्चिमेकडील इस्लामी देशाबरोबर देखील सांस्कृतिक राजनयाच्या माध्यमातून संबंध घनीष्ठ करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. थोडक्यात आपल्या सांस्कृतिक अंगाचा वापर करून आर्थिक विकास साधण्याचा आणि विविध देशांशी संबंध विकसित करण्याचा प्रयत्न मोदी सरकारने केलेला आहे.

**2) लोकराजनयाचा प्रवाह**

परराष्ट्र धोरण हे दोन व्यक्तीमधील किंवा देशांमधील न ठेवता त्याला एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न या सरकारने केला आहे. त्यानुसार राजकीय पातळीवरील संबंधाशिवाय या देशातील लोकांचे इतर देशातील लोकांशी, उद्योगपतींचे तांत्रिक व इतर क्षेत्रातील तंत्रांचे बाकीच्या देशातील मंडळीचे संबंध प्रस्तापित करणे त्यांच्या मध्ये संभाषण चर्चा परिषदा घडून आणणे या माध्मातून लोक राजनयाचा अतिशय उत्तम वापर मोदी यांनी आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये केला आहे. जगातील 100 हुन अधिक देशामध्ये भारतीय स्थापित झालेले आहेत. त्याचे भारताच्या आर्थिक विकासात 'फारेन्स रेमिटन्स' या माध्यमातून योगदान मिळत आहे. जगाला जेव्हा आर्थिक मंदीचा फटका बसतो. त्यावेळी भारत 'फारेन रेमिटन्स' च्या माध्यमातून स्वतःला सावरत असतो त्यामुळे अनिवासी भारतीयांकडे मोदीचे विशेष लक्ष आहे. आपला परदेशी दौरा भरविणे, त्यांना एकत्रीत आणणे, त्यासोबतच त्यांना भावनिक साथ घालून भारतामध्ये गुंतवणुकीसाठी आव्हाण करणे याला मोदीनी प्राधान्य दिले आहे.

**3) लोकशाहीकरणाचा प्रवाह**

आजतागायत भारताच्या परराष्ट्र धोरणाचे क्षेत्र हे परराष्ट्र मंत्रालय आणि तेथील नोकरशाहा याच्यापूरते मर्यादीत होते. परराष्ट्र धोरण म्हणजे केवळ दोन देशाचा राष्ट्र प्रमुख मधील भेटी चर्चा किंवा राजनैतिक पातळीवरील संबंध त्याच्या मधील क्रिया–प्रतिक्रिया अशी ओळख होती. परराष्ट्र धोरणामध्ये सामान्य माणसाच्या आर्थिक आकांशा, अपेक्षा यांचे प्रतिबिंब पाळणे, तेव्हा परराष्ट्र धोरणाने त्याचे प्रतिनिधित्व करणे आवश्यक होते. हा जरी केंद्राचा विषय असला तरी भारतामध्ये संघराज्य व्यवस्था असल्यामुळे राज्याबरोबर त्या संदर्भात संवाद साधणे गरजेचे होते. त्या दृष्टिने या सरकारणे सहकार्यात्मक आणि स्पर्धात्मक संघराज्य हि संकल्पना पुढे आणली. त्यामुळेच परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी प्रत्येक राज्य हे सक्रीय झाल्याचे दिसून आले. बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश अशा राज्यामध्ये प्रवासी भारतीयांची संम्मेलने आयोजित केली गेली. त्याचप्रमाणे राज्याचे मुख्यमंत्री हे गुंतवणुक आकर्षित करण्यासाठी देशाबाहेर जावू लागले. खुद दसतुर मोदी यांच्या सोबत गुजरात आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनी परदेश दौरा केला आणि परकीय गुंतवणुक राज्यात आणली. हा अभिमानाचा प्रयोग देशात पहिल्यांदा पहावयास मिळाला.

**4) आर्थिक प्रवाह**

नरसिंहराव सरकारमध्ये मनमोहन सिंग वित्तमंत्री असतांना परराष्ट्र धोरण्याच्या उद्दिष्टयामध्ये बदल होण्याची प्रक्रिया सुरू झाली. पण आज आर्थिक उद्दिष्टये केंद्र स्थानी मानुन आणि भारताच्या औद्योगिक विकासावर भर देण्याच्या मेक इन इंडियावर कर देऊन मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल सुरू आहे. 2014 ते 2019 या पाच वर्षाच्या कालावधीत भारतात साधारणपणे 500 अब्ज डॉलर इतके परकीय गुंतवणुक आणण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवलेले होते. स्वतः हा मोदी हे आर्थिकदृष्टया प्रगत असणाऱ्या देशांना भेट देऊन त्या राष्ट्रांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी आव्हान करीत आहेत. त्या देशाचे भांडवल आणि तंत्रज्ञान हे भारताच्या आर्थिक विकासासाठी कसे उपयोगी ठरू शकते. यासाठी मोदी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत.

शित युद्धाच्या काळांमध्ये भारताचे परराष्ट्र धोरण हे तत्कालीन परिस्थितीनुसार राजकीय दृष्टिने प्रेरित होते. परंतु मोदी सरकारणी यावर मात करीत भारतामध्ये परकीय गुंतवणुक आणली. नवीन बाजारपेठा विकसित केल्या इतर देशा बरोबर आर्थिक भागीदारी विकसित केली. त्यासोबतच भारताच्या आर्थिक विकास साधण्यासाठी इतर आवश्यक गोष्टीचा पाठपुरावा वेळोवेळी करीत आहेत. त्यामुळेच भारताच्या परराष्ट्र धोरणातून आर्थिक हितसंबंधाचे पुर्ततेचे ध्येय पुर्णत्वास जाताना दिसत आहेत.

**5) नकारात्मक प्रवाह**

मोदीनी देशाच्या परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांना आणि हित संबंधांना कोणत्याही परिस्थितीला धक्का लागणार नाही. याचे विशेष काळजी घेतली आहे. विविध देशांच्या दौरा दरम्यान आपले संबंध विकसित करीत असतांना भारताचे परराष्ट्र धोरणातील निर्णय स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी आणि भारताचे जे गाभाचे हित संबंध आहेत त्यांना धक्का न लागण्यासाठी मोदी सरकारने काही नियमावली तयार केली आहे. विश्व व्यापार संघटनेच्या ट्रेड फॉसी लोटे टेश ॲग्रीमेट संदर्भात भारताने अतिशय कळत स्वरूपाचे धोरण स्विकारत नकाराधिकारही वापर केला. त" ााच प्रकारची कडक स्वरूपाचे धोरण स्विकारत नकाराधिकाराचाही वापर केला. तशाच प्रकारची कडक भूमिका त्यांनी पाकिस्तान बाबत घेतली आहे. काश्मिरचा प्रश्न केवळ भारत आणि पाकिस्तान या दोन देशामधला असून तिसऱ्यामध्ये हस्तक्षेप करू नये अशी स्पष्ट भुमिका घेऊन आपली चुनुक दाखवून दिली. चिन सोबत आर्थिक विकसित करण्यासाठी प्रयत्न करत असतांनाच या सरकारने भारत चीन सीमेवर साध्न संपत्तीचा विकास करण्यास सुरूवात केली आहे. थोडक्यात ऐकीकडे गाजर दाखवायचे तर दुसरीकडे काठी ठेवायचे अशा स्वरूपाचे धोरण या सरकारणे अवलंबील्याचे दिसत आहे.

नियोजनबद्ध परराष्ट्र धोरणाची आखणी ही मोदीच्या परराष्ट्र दौऱ्यावरून सिद्ध होते. शेजारी राष्ट्रांशी संबंध घनिष्ठ करण्याचे ठरविले. त्यामागे शेजारी राष्ट्राचा विश्वास संपादन करणे आणि गेल्या दहा वर्षामध्ये वाढत चाललेला चिनचा दक्षिण आशियातील हस्तक्षेप कमी करणे हे दोन उद्दिष्टये होती. त्यानुसार त्यांनी भुतान, नेपाळ, बांगला देश, श्रीलंका या देशाचे दौरे केले. या दौऱ्यांमधून महत्वपूर्ण गोष्टी घडलेल्या आहेत. आज शेजारी राष्ट्राच्या अर्थव्यवस्था डबघाईला आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना आर्थिक मदत करणे त्याच्या विकास घडवून आणणे इत्यादी गोष्टींना प्राधान्य देण्यात आले. त्यानुसार नेपाळ आणि भुटानमध्ये ज्या विद्युत निर्मितीसाठी मोठया प्रमाणावर मदत करण्यात आले. मागील काही वर्षातील एक सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे भारत आणि बांग्लादेश याच्या मध्ये 1974 पासून प्रलंबित असणाऱ्या भुसीमारेषा करार पुर्णत्वास गेला. त्यामुळे दोन्ही देशामधील भुखंडाच्या अंदला बदलीचा अतीशय कठीण आणि गुंतागुंतीचा प्रश्न सोडविला गेला. त्यामुळे बांग्लादेश सोबतच संबंध सुधारण्यास फार मोठी मदत झाली.

अलीकडच्या काळात परराष्ट्र धोरण हे प्रामुख्याने राष्ट्र प्रमुखाकडून निर्धारित केले जाते व ते अमुलाग्र आणण्यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातात. अमेरिका व इतर प्रगत युरोपियन देशामध्ये परराष्ट्र मंत्राऐवजी राष्ट्र प्रमुखच परराष्ट्र धोरणाला दिशा देण्याचा प्रयत्न करतात. बहुराष्ट्रीय परीषदामध्ये तसेच द्विपक्षीय करार करतांना राष्ट्र प्रमुखच अग्रस्थानी असतात. असाच प्रकार आता भारतात दिसायला लागला आहे.

**निष्कर्ष**

1. मोदी सरकारच्या कालावधीत परराष्ट्र धोरणामध्ये गतीमानता आणि विविधता आलेली आहे.
2. परराष्ट्र धोरणामध्ये मोदींनी व्यक्तीगत लक्ष दिले आणि त्यात ऊर्जा निर्माण केली आहे.
3. परराष्ट्र धोरणात निश्चितता आलेली आहे. यापूर्वी अर्धवट राहिलेल्या योजना काही करार पूर्णत्वास नेले.
4. सर्वात महत्वाचे म्हणजे भारतामध्ये भव्य उच्च स्वप्न पाहण्याची महत्वकांक्षा निर्माण झाली.
5. आतापर्यंत भारताचे वर्णन हे रिलक्टं सुपरपावर परंतु मोदीनी हे चित्र बदलले.
6. भारत आजवर आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये समतोल साधण्याच्या प्रयत्न करीत होता. त्या भूमिकेऐवजी भारताने आता नेतृत्वप्रदान केले पाहिजे अशी भूमिका मोदीच्या नेतृत्वाने दिली.
7. पंडीत नेहरूच्या काळात आशियाचे नेतृत्व भारताने केले पाहिजे अशी नेहरूची कल्पना होती. तशाच पद्धतीने जगात नेतृत्व करणारी सत्ता म्हणून पुढे येण्याची क्षमता भारतात आहे हे जाणीव मोदींचा काळात निर्माण करण्यात आली.

**संदर्भ सूची –**


1. *देवळणकर शैलेंद्र, 'भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर', प्रतिमा प्रकाशन, पुणे, मार्च 2007.*
2. *सपा. टावरी प्रतिभा गायकवाड विनोद, 'सार्क देशांचे शीतयुद्धोत्तर परराष्ट्र धोरणातील स्थित्यंतरे', गो. से. महाविद्यालय, खामगांव, 20 डिसेंबर 2014.*
3. *संपा. देशमुख अलका, 'यशवंतराव चव्हाण संरक्षण व परराष्ट्र विषयक धोरण' सौ. कांता भालेराव, विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स वैकुंठधाम, महाल, नागपूर – 32*
4. *देव अर्जून देव, इंदिरा अर्जून, 'समकालीन विश्व का इतिहास', 1890–2008, औरियेट ब्लैकस्वान प्राइवेट लिमिटेड, नई दिल्ली–02, 2009.*
5. *नाईकवाडे अशोक, 'जागतिक राजकारणातील भारताची भूमिका', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 20 सप्टें. 2014.*
6. *यादव, आर.एस., 'भारत की विदेश नीति', डॉलिंग किडटस्ले नई दिल्ली, 17, 2013.*
7. *मिश्रा राजेश, 'भुमण्डलीकरण के दौर में भारतीय विदेश नीती', गोल्डन पीकॉक पब्लिकेशन, दिल्ली –09, 2016.*